# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २३/०७/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** – दिनांक २२/०७/२०२२ चे ०६.३० वा. चे सुमारास पो.स्टे. एमआयडीसी बोरी हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संदीप रूडे हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. कुही** :– दिनांक २१/०७/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी वय ३२ वर्ष हि आपल्या २ मुलीसह घरी आराम करीत असतांना आरोपी नामे– अमोल सहारे वय ३० वर्ष, रा. खोबना कुही हा फिर्यादीचे घरी येवुन 'काकु दरवाजा खोला मला दोन मिनीटाचे काम आहे' असे म्हटले असता त्यास 'तुला एवढया रात्री काय काम आहे, बाहेरून सांग' यानंतर आरोपीने फिर्यादीला अश्लिल बोलुन तिचा विनयभंग केला. फिर्यादी/पीडिताने त्यास 'तु दारू पिवुन आहे, आता चुपचाप घरी जा' असे म्हटले असता आरोपी जात नव्हता म्हणुन घराजवळ राहणारी बाई हिला आवाज दिला असता तो तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ).३२६, ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी मंडवाले मो.नं.९७६३२२३४५४८ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मनसर येथे दिनांक २९/०६/२०२२ चे दुपारी १२:०० वा. चे सुमारास **दुर्गेश रामाजी बागडे (मृतक), वय ३० वर्षे रा. मनसर** यांने आपल्या राहते घरी घरगुती कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास प्रथम पी.एच.सी. मनसर व नंतर मेडीकल नागपुर येथे नेले असता दि. २०/०७/२०२२ चे २१:०० वा. मरण पावला. सदर मर्ग चे कागदपत्रे मेडीकल पोलीस बुथ नागपुर येथुन दि. २२/०७/२०२२ रोजी टपाल व्दारे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे मेडीकल पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार उके बोन्द्र मो.नं. ९०४९९६५०१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**